# समयाच्या आदिपासून अंतापर्यंत

१ जुलै, २०१८

आत्मीय वाचकांनो,

गुरुपौर्णिमेच्या महिन्यासाठी अनेकानेक शुभेच्छा!

तुम्ही क्षणभर थांबून याचा कधी विचार केला आहे का की, चंद्र पृथ्वीची परिक्रमा करत राहतो, ही किती अद्‌भुत गोष्ट आहे? असे काहीच दृष्टीस पडत नाही ज्याने चंद्राला पृथ्वीशी बांधून ठेवले आहे; या दोघांना जोडणारा ना तर एखादा धागा किंवा दोर दृष्टीस पडतो आणि ना एखादी तार दृष्टीस पडते. तरीसुद्धा निसर्ग, या ब्रह्मांडाचे नियम, गुरुत्वाकर्षणाची शक्ती — हे सर्व एक गोष्ट स्पष्टपणे दर्शवतात की, या दोघांमध्ये एक जोड, एखादा संबंध *निश्चितच आहे,* जो अदृश्य आहे, पण प्रबळ आहे. आणि या जोडाचा, या नात्याचा प्रभाव प्रचंड असतो. चंद्राच्या कलांना अनुसरत, सागराच्या लाटा उचंबळतात आणि पुन्हा स्थिरावतात.

या उदाहरणातील एक गोष्ट जी अतिशय चित्तवेधक आहे, आणि उद्‌बोधकदेखील आहे — ती ही की, भलेही चंद्र आणि पृथ्वी यांच्यातील संबंधाविषयी सांगणारी कोणतीही मोठी घोषणा केली गेलेली नसली, तसेच लाटांची भरती-ओहोटी याव्यतिरिक्त, त्यांच्यातील संबंधाविषयी दुसरा कोणताही संकेत उपलब्ध नसला, तरीदेखील चंद्र आणि पृथ्वी यांच्यातील हा संबंध कायम टिकूनच राहतो. त्या दोघांमधील ती निरंतर गतिजन्यता, ती देवाणघेवाण, त्यांच्यातील ती परस्पर स्वीकृती व दोघांचे एकमेकांना प्रभावित करणे — हे सर्व सतत घडत राहते; मग या ग्रहावरील जीवांना याचा बोध असो किंवा नसो. या दोन्ही आकाशीय पिंडांमध्ये — पृथ्वी आणि चंद्र यांच्यामध्ये एक परस्पर सामंजस्य आहे, निसर्गाच्या विधि-विधानाविषयी एक अनोखे एकमत आहे.

अर्थातच, मनुष्य म्हणून आपली स्वतःची तीव्र, उत्कट आणि मूलभूत एक गरज आहे, की आपल्याला एखादा जोड, एखादे नाते हवे असते. आपली ही मूळ प्रवृत्तीच आहे, त्या जोडाचा, त्या नात्याचा शोध घेणे आणि त्या 'विशेष' नात्यामध्ये स्वतःला खोलवर रुजवणे, जे नाते आपल्यासाठी सर्वाधिकतेने खरे

आणि आपल्यात उपजत आहे. कदाचित ती गुरुत्वाकर्षण शक्ती नसावी जी आपल्याला हा जोड, हे नाते प्राप्त करण्याच्या दिशेने पुढे जाण्यास सतत प्रेरित करत राहते, परंतु एक अत्यंत प्रबळ अशी शक्ती आहे, हे मात्र निश्चित. आणि मला असे वाटते की आपल्याला भाग पाडणारी ही शक्ती, आपल्या बाह्य परिस्थितींना नियंत्रित करणाऱ्या शक्तींपेक्षा अधिक प्रबळ, अधिक सामर्थ्यशाली आहे. प्रश्न हा आहे : आपण आपल्या हृदयाच्या या आदेशाची, या निर्देशाची दखल घेणार आहोत का?

मी तुम्हाला एक प्रसंग सांगते. या ग्रीष्माच्या सुरुवातीला एके दिवशी, श्रीगुरुमाई अनुग्रह बिल्डिंगच्या खालच्या लॉबीमध्ये उभ्या होत्या. त्यांच्यासमवेत एक राखाडी रंगाचा आफ्रिकन पोपटही होता. हा पोपट सर्वप्रथम वर्ष १९९१मध्ये गुरुमाईंकडे आणला गेला होता. तेव्हा तो फक्त पाच महिन्यांचा होता आणि त्या वेळी त्याला पंखदेखील फुटलेले नव्हते. तो अनेक वर्षे श्री मुक्तानंद आश्रमात राहिला होता व आता तो फ्लोरिडात त्याची देखभाल करणाऱ्या व्यक्तीसोबत राहतो, आणि वर्षातून एकदा आश्रमात येतो.

तर त्या दिवशी, तो पोपट आश्रमात आला होता. गुरुमाई खालच्या लॉबीत त्याच्याबरोबर होत्या आणि तो काढत असलेले तऱ्हेतऱ्हेचे सुंदर असे आवाज ऐकत होत्या, जसे आवाज केवळ आफ्रिकन पोपटच काढू शकतात — प्रफुल्लित करणाऱ्या त्याच्या शिट्या, उतार-चढाव असलेले आवाज. अधूनमधून काही सेवाकर्ते लॉबीत येऊन गुरुमाईंना प्रणाम करत होते तसेच त्या पोपटाकडेही पाहत होते. हा परस्पर संवाद अतिशय मधुरतेने व सहजतेने सुरू होता.

काही वेळाने, गुरुमाईंनी वरच्या लॉबीकडे जाणाऱ्या जिन्याकडे पाहिले. एक व्हिजिटिंग सेवाकर्ती त्या जिन्यावरून खालच्या लॉबीकडेच येत होती. काही काळापासून ती सेवाकर्ती गुरुमाईंना दिसली नव्हती. तेव्हा, तिच्यासाठी ती अगदी योग्य वेळ होती, येऊन गुरुमाईंच्या दर्शनाचा लाभ घेण्याची, आणि अर्थातच, त्या पक्ष्यालाही पाहण्याची. गुरुमाई तिला *हाक मारणार, इतक्यात* अचानक ती सेवाकर्ती जिन्यावरून भराभर खाली उतरली आणि दरवाज्याच्या दिशेने गेली, आणि एकदाही मागे वळून न पाहता लगेचच बाहेर निघून गेली.

नंतर या घटनेविषयी गुरुमाई मला म्हणाल्या, "जे घडले त्यात 'थांबणे आणि स्वतःला जोडून घेणे', याचे पालन केले गेले नाही. थांबण्यासाठी आणि स्वतःला जोडून घेण्यासाठी संधी ही नेहमीच उपलब्ध असते."

‘थांबा आणि स्वतःला जोडून घ्या’, ही गुरुमाईंच्या या वर्षाच्या संदेश प्रवचनातील शिकवण आहे आणि वर्ष २०१८मध्ये ज्या संकल्पावर कार्य करण्यास गुरुमाईंनी आपल्याला सांगितले आहे, ही शिकवण त्याचेच एक अंग आहे. ‘थांबणे आणि स्वतःला जोडून घेणे’ — ही पद्धत आहे ज्यायोगे आपण कोणत्याही स्थळी, कोणत्याही वेळी आपल्या स्वतःच्या सत्संगाची रचना करतो. आपण ‘थांबतो’, म्हणजे आपल्या मनात सुरू असलेल्या वटवटीपासून दूर जाण्याकरता आपण विराम घेतो, ज्या गोष्टी सतत आपल्या डोक्यात घोळवत ठेवणे आपल्याला आवडते, त्यांच्यापासून दूर जाण्याकरता आपण काही क्षण थांबतो; जे मनोभाव आपल्या आत खळबळ माजवतात आणि आपल्याला जरूरीपेक्षा जास्त स्वतःमध्ये गुंतवून ठेवतात, त्या मनोभावांपासून दूर जाण्यासाठी आपण क्षणभर थांबतो; आणि आपण वर्तमानात उपस्थित राहण्याचा प्रयत्न करतो. आपण ‘स्वतःला जोडून घेतो’, म्हणजे आपण स्वतःला त्याच्याशी जोडतो, त्याच्याशी सुसंगतता साधतो, जे आपल्या समोर आहे आणि जे आपल्या अंतरात आहे, म्हणजे कृपारसाचे ते अनंत कुंड जे आपल्या दिशेने वाहण्यास अगदी तयारच आहे.

‘थांबा आणि स्वतःला जोडून घ्या’ — किती यथायोग्य शिकवण आहे, गुरुपौर्णिमेच्या या महिन्यात अभ्यास करण्यासाठी आणि पुढे मनन करण्यासाठी! तो जोड, ते नाते — हीच ती प्रेरकशक्ती आहे, जिच्यामुळे या पर्वाचा जन्म झाला; गुरू आणि शिष्य यांच्यातील नाते, एक साधक आणि त्या महात्म्याच्या दरम्यान असलेले नाते जे ज्ञानाचे मूर्तरूप आहेत व परम सत्याचे ज्ञान प्रदान करतात. या नात्याप्रति असलेल्या कृतज्ञतेच्या भावाखातरच महर्षि वेदव्यास यांचे शिष्य आपल्या श्रीगुरूंचा सन्मान व त्यांना वंदन करू इच्छित होते; ते आपल्या गुरूंचे पूजन करू इच्छित होते, आणि म्हणून, आषाढ महिन्यातील पौर्णिमा या उद्देशाला समर्पित केली जाऊ लागली, या महिन्यातील पौर्णिमेचा चंद्र हा वर्षातील सर्वाधिक पूर्ण आणि सर्वाधिक देदीप्यमान चंद्र असतो. [तुम्ही वेबसाइटवर गुरुपौर्णिमेविषयीची गोष्ट जरूर वाचा.]

मी तुम्हाला प्रोत्साहित करेन की, गुरुपौर्णिमेच्या दिवशी आणि त्याआधीच्या दिवसांच्या आणि आठवड्यांच्या दरम्यान तुम्ही, श्रीगुरू आणि तुमच्यात असलेल्या नात्याच्या स्वरूपाविषयी अन्वेषण करावे. हे अन्वेषण जेव्हा तुम्ही कराल, तेव्हा हे समजून घ्या की, अशा प्रकारच्या अध्ययनामध्ये सातत्य राखणे आवश्यक असते. तुम्ही फक्त एकदाच विराम घेऊन, स्वतःला जोडून घेण्याचा अभ्यास करत नाही. तुम्ही विराम घेण्याचा, थांबण्याचा अभ्यास *पुन्हापुन्हा* करता; तुम्ही स्वतःला जोडून घेण्याचा अभ्यास *पुन्हापुन्हा* करता, तुम्ही स्वतःच्या हृदयात प्रवेश करता आणि त्यामध्ये खोलवर उतरत जाता, कारण ज्या नात्याविषयी आपण बोलत आहोत ते एखादे निष्क्रिय किंवा गतिहीन नाते नाही, तर ते एक

अतिशय चैतन्यमय, प्रवाही व स्पंदित होत राहणारे नाते आहे, ते विविध रूपे धारण करत राहते आणि त्यामध्ये अनेक बारकावे निहित आहेत. हे नाते स्वतःच एक परिपूर्ण लोक आहे.

आणि हा लोक — असा आहे जणू ब्रह्मांडाचा तो विस्तार जो चंद्र आणि पृथ्वी यांच्या दरम्यान विद्यमान आहे! यामध्ये 'माझे' किंवा 'तुझे' नसते. यामध्ये एकमेकांचे होऊन जाणे आहे, पण कोणाचेही कोणावर स्वामित्व नाही; यामध्ये प्रेम आहे, पण त्या प्रेमात कोणताही हेतू किंवा स्वार्थ नाही. होय, यामध्ये कर्तव्य आहे; होय निश्चितच, यामध्ये अनुशासन आहे, पण ते बळजबरीने लादलेल्या दायित्वासारखे वाटत नाही. एकमेकांशी जोडलेले असण्याच्या या लोकात, 'देणे' हे असे मुक्तहस्ते असल्याचे प्रतीत होते, जणू काही समुद्राच्या उंच उचंबळणाऱ्या लाटा अनंत प्रचुरतेमुळे स्वतःला किनाऱ्यावर पसरून टाकतात. आणि या लोकामध्ये 'घेणे'देखील तितक्याच सहज-स्वाभाविकपणे घडते — जणू समुद्र मागे सरकणाऱ्या लाटांना अलगदपणे स्वतःमध्ये सामावून घेतो व किनाऱ्यासाठी जागा करून देतो.

***

गुरुपौर्णिमेचा चंद्र या वर्षी २७ जुलैला आपली पूर्ण कला प्राप्त करेल. त्याच दिवशी पुढील खग्रास चंद्रग्रहणदेखील आहे. हे २१व्या शतकातील सर्वाधिक दीर्घकालीन चंद्रग्रहण असेल, ज्याचा कालावधी १ तास आणि ४३ मिनिटे असेल. हे चंद्रग्रहण भारत तसेच संपूर्ण आशिया खंडात, त्याचबरोबर मध्य पूर्वीय देशांमध्ये, आफ्रिका, युरोप आणि दक्षिण अमेरिका येथे दिसेल.

हा काळ घटनांचा एक अद्‌भुत संगम आहे, ग्रहण आणि गुरुपौर्णिमा. याविषयी एक अद्‌भुत गोष्ट अशी आहे की, हा काळ निश्चितच अतिशय शुभ असेल, असा काळ जो आध्यात्मिक साधनेसाठी उपयुक्त असेल. आणि माझ्या मते, दुसरी अद्‌भुत गोष्ट ही आहे की, या खगोलीय घटनेतून एक प्रतीकात्मक अर्थ काढता येईल तसेच या विचारातूनही आपल्याला एक सांकेतिक अर्थ काढता येईल की भलेही आपण आपल्या बहिर्मुखी इंद्रियांद्वारे चंद्राला नेहमीच पाहू शकत नाही, तरीदेखील तो असतो; तो *तिथेच असतो,* त्याच्या संपूर्ण वैभवासह!

अशा अनेक पद्धती आहेत ज्यायोगे या पावन दिवसाचा आणि महिन्याचा अधिकाधिक लाभ घेता येईल, गुरुपौर्णिमेचे पर्व आणखी उत्कृष्ट रीतिने साजरे करता येईल. आपण 'थांबणे आणि स्वतःला जोडून घेणे' याचा अभ्यास निश्चितच करू शकतो, असे आपण पुन्हा करू शकतो; आपण हा अभ्यास अनेकदा करू शकतो. त्याचबरोबर — आपण दक्षिणा अर्पण करू शकतो. गुरुपौर्णिमेला दक्षिणा अर्पण करण्याची परंपरा प्राचीन काळापासूनच आहे आणि ही परंपरा आजतागायत सुरू आहे.

आपल्याकडे दक्षिणेचा अभ्यास करण्याची सुसंधी आहे, हीच गोष्ट श्रीगुरूंच्या करुणेविषयी बरेच काही सांगून जाते, कारण जर तुम्ही विचार केला, तर तुमच्या हे लक्षात येईल की, सद्‌गुरूंप्रति असलेल्या कृतज्ञतेचे मोजमाप करणे किंवा त्याचे परिमाण ठरवणे खरोखरच अशक्य आहे. आपल्याला निरंतर जितके प्राप्त होते, तितक्याच प्रमाणात त्याची परतफेड करणे तर दूर, ती परतफेड करण्याच्या आसपास पोहोचणेदेखील आपल्याला अशक्य आहे. असे असले तरीही, दक्षिणा अर्पण करण्याच्या स्वरूपात, आपल्याकडे ती क्षमता आहे की, आपण *काहीतरी* करू शकू. आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दक्षिणेच्या अभ्यासाच्या रूपात आपल्याकडे एक ठोस मार्ग आहे.

आणि तुम्ही जेव्हा दक्षिणा अर्पण करता, तुम्ही जेव्हा स्वतःला श्रीगुरूंच्या चरणकमलांवर अर्पण करता, तेव्हा निश्चितच एक किमया घडते. सुरुवातीला तुम्हाला कदाचित ती जाणवणारही नाही. पण कालांतराने, तुम्ही जसजसे अर्पण करत राहता, जसजसे तुम्ही ‘देण्याचा’ आपला भाव, ‘देण्याच्या’ आपल्या शक्तीचा विकास करत जाता, तसतसे तुमच्या लक्षात येऊ लागते की खरोखरच काहीतरी घडते आहे, तुम्हाला ते स्पष्टपणे जाणवू लागते. तुम्ही या अभ्यासाच्या शक्तिमंडलात उतरता व तिच्या स्पंदनाशी एकरूप होऊन जाता. हे ‘देणे’ आणि ‘घेणे’ यांचे एक चक्र आहे. हे एक सजीव, सक्रिय नाते आहे, ही ब्रह्मांडात होत राहणारी देवाणघेवाण आहे जी तुमच्या स्वतःच्या हृदयात घडते.

मी तुम्हाला प्रोत्साहित करेन की, तुम्ही स्वामी ईश्वरानंद यांच्याद्वारे लिखित सुंदर आमंत्रण वाचावे. यामध्ये ते आपल्याला गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने दक्षिणा अर्पण करण्यासाठी आमंत्रित करतात, आणि तुम्ही इथेच, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटद्वारे दक्षिणा अर्पण करू शकता.

जुलैच्या संपूर्ण महिन्यादरम्यान वेबसाइटवर इतर आणखी काही मार्गदेखील उपलब्ध केले जातील ज्यांच्या साहाय्याने तुम्ही गुरुपौर्णिमा साजरी करू शकता. उदाहरणार्थ, वेबसाइटवर, गुरु-शिष्य संबंधाच्या विषयावर अधिक प्रकाश टाकणारा लेख असेल. गुरुपौर्णिमेसंबंधी गोष्टी असतील : अमीर खुसरो व त्यांचे गुरू हजरत निजामुद्दीन यांची पारंपरिक गोष्ट आणि छांदोग्य उपनिषद्‌ातील सत्यकाम जाबाल याची गोष्ट. गुरुपौर्णिमेच्या दिवशी एक संधी तुम्हाला लाभेल, एका सिद्धयोग विद्यार्थ्याने केलेले व्याख्यान वाचण्याची, त्याचबरोबर श्री मुक्तानंद आश्रमाच्या आकाशातील पूर्णचंद्राचे व्हीडिओद्वारे दर्शन घेण्याचा लाभही तुम्हाला मिळेल. आणि या सर्व गोष्टींच्या व्यतिरिक्त, तुमच्याकडे आणखी एक विशेष सुसंधी असेल, त्या सद्‌गुणाचे अधिक गहनतेने अन्वेषण करण्याची जो गुरुमाईंनी त्यांच्या जन्मदिनी आपल्याला प्रदान केला — तुम्ही ‘कर्मण्यता’ यावरील वेबसाइटवर दिलेले भाष्य वाचू शकता.

पंधराव्या शतकात होऊन गेलेले, भारताच्या वाराणसी येथील महान संतकवी कबीर यांनी आपल्या एका भजनात लिहिले आहे :

> मोही तोही आदि अन्त बन आई
> अब कैसे लगन दुराई ॥
>
> समयाच्या आदिपासून अंतापर्यंत, तुझ्या-माझ्यामध्ये एक नाते आहे.
> या प्रेमात आता कोणताही दुरावा कसा असू शकेल, हे प्रेम खंडित कसे होऊ शकेल?[१]

किती गहन आहेत हे शब्द, गुरुपौर्णिमेच्या महिन्यादरम्यान आपल्या हृदयात धारण करण्याकरता! अखेर, नाते किंवा जोड असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ काय असतो? तो कोणता अनुभव आहे, ज्याच्याशी आपण स्वतःला जोडून घेतो, ज्याच्याशी आपण अनुसंधान साधतो; ती कोणती शक्ती आहे जी श्रीगुरू आणि आपल्या दरम्यान असलेल्या नात्यामध्ये प्रवाहित होते आणि जी या नात्याला अतूट बनवते? कबीर साहिब म्हणतात की ही 'लगन' आहे, हे 'प्रेम' आहे. हेच ते प्रेम आहे जे आपल्या अंतरंगातील गहनतेत सौम्यतेने खळखळते आहे, अगदी तसेच जसे समुद्राच्या तळाशी जलधारांचे तरंग हळुवारपणे पसरत असतात. हे प्रेम तीव्र उत्कंठेने अलंकृत असते आणि त्या क्षणांमध्ये विशेष रूपाने जाणवते, जेव्हा आपले हृदय या उत्कंठायुक्त प्रेमाने काठोकाठ भरलेले असते, आणि त्या वेळी असे वाटते जणू अतिशय प्रेमामुळे नृत्य करण्याखेरीज हृदयाकडे दुसरा कोणताच मार्गच उरलेला नाही, कारण खोलवर अंतरात कुठेतरी आपल्याला हे माहित असते : असे एक विशाल हृदय आहे ज्याचा आपण भाग आहोत; आणि हे विशाल हृदय त्या असीम विस्ताराप्रमाणे आहे ज्यामधून चंद्र आणि ताऱ्यांची उधळण होऊन ते अनंततेमध्ये विखुरले जातात.

आदरपूर्वक,

ईशा सरदेसाई

---

[१] इंग्रजी भाषांतर © २०१८ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन.

© २०१८ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.